# प्रकरण दुसरे

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास

# प्रकरण - दुसरे

# संबंधित साहित्याचा अभ्यास

## २.१ प्रास्ताविक :

संशोधकाने अभ्यासासाठी ज्या समस्या-क्षेत्राची निवड केली असेल त्यातील प्रकाशित सामग्रीचा शोध व त्याचे चिकित्सक विश्लेषण संबंधित साहित्याच्या समालोचनात अभिप्रेत असते.

संशोधन समस्या निश्चित व नेमकी केल्यानंतर आपल्या संशोधन समस्येसारखीच समस्या सोडविण्यासाठी पूर्ववर्ती अभ्यासकांनी कोणत्या अभिकल्पाचा उपयोग केला आहे, आधारसामग्री संकलित करण्यासाठी कोणती साधने वापरली आहेत, त्या साधनांची सप्रमाणता व विश्वसनीयता काय आहे, संकलित आधारसामग्रीचे विश्लेषण कोणत्या सांख्यिकीच्या आधारे केले आहे, कोणते निष्कर्ष काढले आहेत या बाबींची माहिती करुन घेण्याच्या दृष्टीने संशोधकाने पूर्ववर्ती संशोधन साहित्याची चिकित्सक व सर्वंकष तपासणी करावयाची असते.

संशोधकाला संशोधन कार्य करण्यापूर्वी व कार्य चालू असताना अनेक प्रकारचे संशोधित साहित्य वाचावे लागते. संशोधकाने संबंधित संशोधन साहित्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करुन आढावा घेतला आहे.

१) भाषिक कौशल्या संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास.

२) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत उपक्रमांच्या वापरासंबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास.

३) अध्यापन विषयातील संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास.

## २.२ भाषिक कौशल्या संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास :

**२.२.१ श्रद्धा शरद नेवगी - 'मराठी विषयाच्या लेखनामधील पत्रलेखन : एक समस्या'**, (पूर्व प्राथमिक शाळा आकेरी, नं.१, ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे, ३०, २००३.

**उद्दिष्टे -**

१) विद्यार्थ्यांच्या मनात पत्रलेखनाविषयी आवड निर्माण करणे.

२) पत्र लिहिताना महत्वाच्या सहा गोष्टी कोणत्या हे समजून घेणे.

३) घरगुती पत्रांचे मायने कोणते हे समजून घेणे.

४) वयोमानानुसार संबोधन कसे करावे हे पाहणे.

५) पत्रलेखानमध्ये शैलीदार मराठी भाषा कशी विकसित होईल हे पाहणे.

६) वाकप्रचारांचा उपयोग, कुतूहल, मनातील वेगळे भाव प्रकट करणे.

७) प्रयोग पद्धतीने पत्रलेखन करुन घेऊन आदर्श पत्रलेखन होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

**निष्कर्ष -**

१) विद्यार्थ्यांना पत्रलेखन कसे करावे हे समजल्याने त्यांच्या आत्मविश्वास वाटला.

२) पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्र यावर मजकूर लिहून आपल्या इष्ट मित्रांना व नातेवाईकांना पत्रे पाठवू लागली. काही विद्यार्थ्यांना पत्रे पाठविल्यानंतर अभिनंदनपर उत्तरेही मिळाली.

३) घरगुती पत्रलेखन करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन मिळाले.

४) पत्रलेखनाबद्दल मुलांना आवड निर्माण झाली.

५) पत्रलेखनाची उद्दिष्टे पूर्ण करण्यात बहुतांशी मदत झाली.

६) मुलोच मराठी भाषेतील लेखन कौशल्य विकसित झाले.

**२.२.२ आशा सुरेश साने -**

**''सृजनशील प्रतिमानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या निबंध लेखन क्षमतेवर होणारा परिणाम अभ्यासणे.''** नवोपक्रम पद्धती - महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे - ३०, २००३.

**उद्दिष्टे -**

१) विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तीला चालना देणे.

२) आपले विचार सुसंगतपणे मांडता येणे.

३) निबंध लेखनाची कौशल्ये आत्मसात करणे.

४) कल्पना शक्तींमध्ये वाढ होणे.

५) विस्तारपूर्वक लेखन करता येणे.

**निष्कर्ष -**

१) विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली.

२) विद्यार्थी नवनवीन कल्पनांचा वापर निबंधात करु लागले.

३) निर्जीव वस्तूंना सजीव मानू लागले.

४) कल्पनेत रममाण होऊ लागले.

५) सर्व विद्यार्थी आनंदाने या प्रयोगात सामील होत होते.

६) अभ्यासाचा कंटाळा करणारे विद्यार्थी निबंधासारख्या विषयात रस घेऊ लागले.

७) वार्षिक परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी निबंधाचा प्रश्न सोडविला. प्रयोगाचा वार्षिक परीक्षेवर चांगला परिणाम दिसून आला. त्यांच्या निबंधात ५ ते ६ उपमा होत्या. उत्तरपत्रिकेची १ ॥ ते २ पृष्ठे निबंध लिहिला होता.

### २.२.३ विजया राजाराम पाटील -

**"भाषिक खेळातून मराठीचे अध्यापन करणे व परिणाम अभ्यासणे."** (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन संस्था, पुणे - ३०) २००३.

**उद्दिष्टे -**

१) भाषेचे अध्यापन मनोरंजक करणे.

२) अध्ययन टिकाऊ करणे.

३) खेळ व स्पर्धा यांचा उपयोग अभ्यासासाठी करुन घेणे.

४) विद्यार्थ्यांच्यात अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांच्या तर्कशक्तीला वाव देणे.

६) विद्यार्थ्यांची संग्रहवृत्ती वाढविणे.

७) भाषा अध्यापनात 'भाषिक खेळांचा' वापर करताना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

**निष्कर्ष :**

१) विद्यार्थ्यांच्यात अवांतर वाचनाची गोडी निर्माण झाली.

२) जाणीवपूर्वक उपक्रम राबविल्याने यश मिळाले.

३) विद्यार्थ्यांची संग्राहक वृत्ती वाढली.

४) अध्यापन आनंददायी झाले.

५) शब्दकोडी सोडविण्याचा सराव झाल्याने विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहात वाढ झाली.

**२.२.४ अ. अ. लाटकर -**

**''विविधांगी उपक्रम आणि क्षमतांचे विकसन''** (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व परिसर, पुणे - ३०) २००३.

**उद्दिष्टे -**

१) विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी, अभ्यासाविषयी, मातृभाषेच्या अध्ययनाविषयी गोडी निर्माण करणे.

२) विविधांगी उपक्रमांच्या माध्यमातून भाषा विषयाच्या सर्व क्षमता प्रत्येक मुलांमध्ये प्रभुत्व पातळीपर्यंत विकसित करणे.

३) पारंपारिक अध्ययन-अध्यापन प्रक्रियेऐवजी कृतिशील, बालकेंद्रित, आनंददायी, उपक्रमाधिष्ठित पद्धतींचा वापर करणे.

४) उपक्रमांच्या माध्यमातून हसतखेळत क्रीडन पद्धतीने अध्ययन-अनुभव दिल्यास भाषेच्या अध्ययनात गोडी निर्माण होते की नाही याचा पडताळा घेणे.

५) उपक्रमातून कृतिशील, आनंददायी पद्धतीतून स्वयंअध्ययनास चालना देऊन भाषिक क्षमता किती प्रमाणात विकसित होतात ते तपासणे.

**२.२.५ पावगी प्रतिभा :**

**'टी. व्ही. आणि टेपरेकॉर्डरचना वापर करुन अध्यापन कसे प्रभावी करता येईल.''**

(महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था, पुणे ३०) २००३

**उद्दिष्टे -**

१) साधन निर्मितीतून टी. व्ही. तयार करणे व टेपरेकॉर्डर वापरुन शिक्षणात रंजकता निर्माण करणे.

२) दृक-श्राव्य साधनातून स्वयंअध्ययनाची वृत्ती वाढविणे.

**निष्कर्ष -**

१) शिक्षणात रंजकता आली व मुलांचे ज्ञान पक्के घेण्यास मदत झाली.

२) चित्रवाचन व वर्णन ऐकणे एकाच वेळी होत असल्याने महत्वपूर्वक ऐकण्याची क्षमता मुलांच्यामध्ये निर्माण झाली. त्याबरोबर भजन करण्याची सवय मुलांना लागली.

३) थोड्या वेळात खूप व पक्के लक्षात राहणारे शिक्षण मिळते असे दिसून आले.

२.३.१ सुनील नामदेवराव मुंडे -

**"जि. प. वरिष्ठ प्राथ. शाळा बेंबज येथील इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे."** (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे, ३०) २००३.

**उद्दिष्टे -**

१) विद्यार्थ्यांना कविता, गाणी, लेख, निबंध, बातम्या, पत्रे इ. वेगवेगळ्या प्रकारच्या लेखन साहित्याची माहिती करुन देणे.

२) मनोरंजक बालकथा, लोककथा, साहित्यकथा, चित्रकथा, नाटिका, गाणी इ. द्वारे विद्यार्थ्यांना मनोरंजनाची संधी उपलब्ध करुन देणे.

३) वर्तमानपत्रांतील माहिती वाचण्यास सांगून त्याद्वारे विविध घडामोर्डींविषयी माहिती करुन देणे.

४) अवांतर वाचनामधून विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती विकसित करणे.

५) मुलांच्या आवडी-निवडीनुसार पुस्तके उपलब्ध करुन त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे.

६) वाचन कौशल्ये विकसित करुन ज्ञान संपादनास प्रोत्साहित करणे.

७) अवांतर वाचनासाठी साहित्य उपलब्ध करुन देणे व वाचनाची गोडी निर्माण करणे.

८) बोधकथांची, थोर नेत्यांची पुस्तके वाचायला देऊन नैतिक शिक्षणाची संधी देणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये योग्य गतीने, योग्य आवाजात, सुस्पष्ट शब्दांत वाचन करण्याची सवय रुजवणे.

१०) वाचन करताना येत असणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी उपाय सुचविणे.

११) वाचन कौशल्ये विकसित करुन शैक्षणिक प्रगतीस व सर्वांगीण विकासास मदत करणे.

**निष्कर्ष :**

१) वर्गातील मुलांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण झाली, तसेच वाचनासंबंधी आवड निर्माण झाली.

२) घरी व शाळेत मिळणाऱ्या फावल्या वेळेत पुस्तके, वर्तमानपत्रे वाचनाची सवय मुलांना लागली.

३) अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह पूर्वीपेक्षा वाढला.

४) अभ्यासू वातावरण तयार करण्यास मदत झाली.

५) मनोरंजक कथा, बोधकथा इ. मधून शैक्षणिक व बौद्धिक विकासास चालना मिळाली.

६) चांगल्या वाचनाच्या पद्धती मुलांना माहीत झाल्या.

७) कथा-कथनामुळे 'सभाधीटपणा' हे कौशल्य विकसित होण्यास मदत झाली.

८) थोर नेत्यांचे आदर्श, राष्ट्राभिमान इ. बालमनावर सुसंस्कार घडवून मूल्यशिक्षण सहज शक्य झाले.

९) वाचनात मुलांना येणाऱ्या समस्या लक्षात येऊन त्यावर उपाय सुचविण्यास मदत झाली.

**२.३.२ राजेश गवळी :**

**'मराठी पूर्व माध्यमिक शाळा डोंमरुळ येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास,''** (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे - ३०) २००३.

**उद्दिष्टे -**

१) निरनिराळे तक्ते, आकृत्या, फळा, शब्दपट्ट्या, हाताने लिहिलेला मजकूर विद्यार्थ्यांना वाचता यावा.

२) वर्तमानपत्रे, पाठ्यपुस्तक, कार्डावरील मजकूर विद्यार्थ्यांना समजपूर्वक वाचता येणे.

३) मुळाक्षरे स्वतंत्रपणे किंवा शब्दात आल्यास वाचता येणे.

४) शब्दांचे स्पष्ट शुद्ध वाचन करता येणे.

५) जोडाक्षरयुक्त शब्दांचे अचूक वाचन करता येणे, वाक्य अस्खलितपणे वाचता येणे.

६) विरामचिन्हांची वाचनात दखल घेण्याची क्षमता निर्माण करणे व शब्दांवर आशयानुसार आघात देण्याची सवय लावणे.

७) दैनंदिन जीवनात उपयुक्त छापील मजकुराचे वाचन करून आकलन होण्याची क्षमता निर्माण करणे.

८) योग्य उच्चार, योग्य स्वराघात आणि अभिव्यक्ती यांच्या मेळ साधून अस्खलितपणे प्रकट वाचन करता येणे.

९) योग्य रीतीने मूकवाचन करता येणे आणि जे वाचले त्याचे नीट आकलन होणे.

१०) विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्याची क्षमता निर्माण होणे.

११) रंगभूमी, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, नियतकालिके या माध्यमांद्वारे भाषिक अनुभव विकसित करून घेणे.

**निष्कर्ष -**

१) नियोजनबद्ध व शास्त्रशुद्ध पद्धतीने उपाययोजना कार्यान्वित केल्याने वाचन क्षमतेचा विकास साध्य झाला.

२) विद्यार्थ्यांच्या वाचनात सुधारणा झाली असे आढळले.

### २.४.१ डॉ. पुष्पा गोविंद घळसासी :

"माध्यमिक शाळेला जोडलेल्या इयत्ता पाचवीच्या वर्गामध्ये मराठीच्या विषयाचे कौशल्य सुधारण्यासाठी प्रयत्न करणे व त्याचा परिणाम अभ्यासणे." २००३

**उद्दिष्टे -**

१) प्रमाण भाषेत बोलण्याची मुलांना सवय लावणे.

२) मुलांना चांगले मराठी ऐकविणे.

३) मुलांचे मराठीतील संभाषण कौशल्य वाढविणे.

४) मराठी विषयातील प्रगल्भता समजावून देणे.

५) मुलांचे मराठीचे वाचन सुधारणे.

६) मुलांची कल्पना शक्ती, विचार शक्ती यांना चालना देणे.

७) मुलांचे, लेखन कौशल्य सुधारणे.

८) कविता, निबंध, गोष्टी यांतून लेखनाचा विकास करणे.

**निष्कर्ष -**

१) हा प्रयोग भाषेचे अध्यापन करताना लक्षात ठेवला आणि त्याचा मुलांना खूपच फायदा झाला. त्यांचे गुण सहामाही परीक्षेपेक्षा वाढल्याचे दिसून आले.

२) मुलांना शब्द खेळांची गोडी लागल्याचे पालकांनी सांगितले.

३) वार्षिक परीक्षेच्या निर्णयानंतर अनेक पालकांनी "तुम्ही जसे सांगितले तसाच अभ्यास घेतल्याने आमच्या मुलांना सहामाहीपेक्षा कितीतरी जवळ जवळ २० गुण मराठीत जास्त मिळाले", असे प्रत्यक्ष पालकांनी भेटून सांगितले.

४) त्या मुलांचे इयत्ता चौथीच्या व पाचवीच्या सहामाही व वार्षिक परीक्षेतील मराठीच्या मुलांची पाहणी केली तेव्हा इयत्ता पाचवीतील वार्षिक परीक्षेमध्ये बरेच गुण जास्त मिळाल्याचे दिसून आले.

५) मराठीच्या तासाला मुले कधीही कंटाळत नव्हती. उलट मोकळ्या तासांना तुम्ही या असा आग्रह धरत होती.

६) यावरुन भाषार समृद्ध करण्यासाठी श्रवण, संभाषण, वाचन, लेखन, कल्पना व विचार आणि निबंध या गोष्टींची कौशल्ये वाढविणे अगत्याचे आहे.

## २.५ सारांश :

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने एकूण आठ संशोधन विषयांशी संबंधित साहित्याचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये संबंधित साहित्याचे वर्गीकरण तीन गटात करुन संबंधित साहित्यांची उद्दिष्टे व निष्कर्ष या बाबींचा आढावा घेतल

भाषिक कौशल्या संबंधीच्या संशोधन साहित्यामध्ये माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये अभ्यास केलेला दिसून आला. त्यामध्ये सदरहू कौशल्ये प्राप्त होण्यासाठी किंवा त्याचा विकास होण्यासाठी साधनांचा, उपक्रमांचा प्रत्यक्षात वापर व वापर न करण्याची कारणे याचा आढावा घेतलेला दिसून आला.

अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत उपचारात्मक उपक्रमांचा वापर केल्याचे दिसून आले. यामध्ये दृक-श्राव्य साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे. शैक्षणिक साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. सध्याची स्थिती व त्यावरील उपाय व शिफारशी यांचा अभ्यास, वर्ग अध्यापनातील शैक्षणिक साधनांचा, उपक्रमांचा परिणामकारक वापरावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास करण्यात आला आहे. क्षमता प्रभुत्व पातळी प्राप्त करण्यापर्यंतची परिस्थिती या संशोधन संबंधित साहित्यात केला आहे. दृक-श्राव्य साधनांचाही प्रत्यक्ष वापर केल्याने प्रत्यक्ष उद्दिष्टे साध्य होण्यासाठी व निष्कर्ष प्राप्तीसाठी या संशोधन साहित्यात वापर केला आहे.

वरील सर्व संशोधनामध्ये उपक्रमांची उपलब्धता, उपयुक्तता व प्रत्यक्ष अध्यापनात वापर यावर संशोधन झालेले आढळते. परंतु प्रत्यक्ष अलीकडील क्षमताधिष्ठीत अभ्यासक्रमातील क्षमता प्राप्तीसाठी, प्रभुत्व संपादन पातळीसाठी उपचारात्मक व समृद्धी उपक्रमांद्वारे संशोधन झाले नसल्याचे आढळले. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन हे मूलभूत व नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.